


दैनिक

● संपादक: वैभव धबडगे

# प्रजाशाहीचा आवाज

९८२२४७४८०७ /८७६६४९८५०३



हिंगोली जिल्ह्यातून प्रकाशीत होणारे ! W वर्ष ०२ W०८ रविवार ०८ फेब्रुवारी २०२६ W पृष्ठे : ४ W किंमत :०२.००

prajashahichaawaj@gmail.com
website : www.prajashahichaawaj.in

# महाबोधी महाविहार मुक्तीसाठी जंतर-मंतरवर

# 12 फेब्रुवारी पासून बौद्धांचा एल्गार

नवी दिल्ली | प्रतिनिधी

महाबोधी महाविहाराच्या मुक्तीसाठी येत्या 12 फेब्रुवारी 2026 रोजी दिल्लीतील जंतर मंतर येथे देशव्यापी आंदोलन होणार आहे. या आंदोलनात देशभरातून हजारो बौद्ध बांधव सहभागी होणार असून महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्याची ठाम मागणी केली जाणार आहे.यासंदर्भात बोलताना आमदार व माजी मंत्री राजकुमार बडोले म्हणाले की, महाबोधी येथे भगवान बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली, हे संपूर्ण जग मान्य करतं. मात्र आज त्या पवित्र



स्थळी बुद्धांना स्थान नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. महाबोधी महाविहाराचं व्यवस्थापन बौद्ध समाजाकडे असणं आवश्यक आहे. या आंदोलनाला माझा पूर्ण पाठिंबा आहे.आमदार राजकुमार बडोले यांनी माहिती देताना पुढे सांगितले की, त्यांनी नुकतीच केंद्रीय मंत्री किरण रिजिजू यांची भेट घेतली असून, मंत्री रामदास आठवले यांनीही विविध स्तरांवर भेटी घेऊन हा विषय सरकारपुढे मांडला आहे. दरम्यान, संघरत्न भंते यांनी सांगितले की, दीक्षाभूमी ते चैत्यभूमी अशी जागृती यात्रा आम्ही महाराष्ट्रात काढली होती. बौद्ध अनुयायांमध्ये जनजागृती करणं हाच आमचा उद्देश आहे. 1949 चा बिहार मंदिर व्यवस्थापन कायदा हा कसा अन्यायकारक आहे, हे आम्ही लोकांपर्यंत पोहोचवलं. ते पुढे म्हणाले, महाबोधी येथील बुद्धविहार बुद्धांच्या ताब्यात यावा हे सरकार मान्य करत नाही, ही गंभीर बाब आहे. बौद्धांच्या विहारात इतर धर्मीयांचे नियंत्रण का, हा आमचा मूलभूत प्रश्न आहे. याआधी भंते विनयाचार्या यांनी जेव्हा देशव्यापी आंदोलन उभं केलं, तेव्हा त्यांना तब्बल 68 दिवस कारागृहात डांबण्यात आलं होतं. 12 फेब्रुवारी रोजी जंतर मंतर, नवी दिल्ली येथे होणाऱ्या या ऐतिहासिक आंदोलनासाठी महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने बौद्ध बांधव सहभागी होणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं.

## बेरुळा येथे त्यागमूर्ती माता रमाई यांच्या 128 वी जयंतीच्या निमित्ताने भव्य कार्यक्रमाचे आयोजन




बेरुळा (ता. औंढा नागनाथ, जि. हिंगोली) भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील संघर्षाला बळ देणाऱ्या, त्याग, शील आणि करुणेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२६ रोजी बेरुळा येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.माता रमाई यांचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी झाला. त्यांनी संपूर्ण आयुष्य बाबासाहेबांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि वैचारिक लढ्याला साथ देण्यात घालवले. भारतीय पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्री म्हणून त्यांनी सहन केलेले कष्ट, त्याग आणि संयम आजही समाजासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हा जयंती सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता ध्वजारोहणाने होणार असून ध्वजारोहणाचा मान श्री. गणेश राहीरे (पोलीस निरीक्षक, औंढा नागनाथ) व श्री. दत्ता कानगुले (पोलीस उपनिरीक्षक, औंढा नागनाथ) यांच्या हस्ते पार पडणार आहे.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून त्यामध्येमा. दिनेश हनुमंते, मा. किरण घोंगडे, मा. अशोक निकाळजे, मा. राजकुमार इंगोले, मा. प्रमोद कुलदीपके, मा. वैभव धबडगे, मा. सुभाष कुंठे, सौ. प्रतिभाताई प्रविण टोणे, सौ. कुंताताई सुनील दिपके आदी मान्यवरांचा समावेश आहे.सायंकाळी माता रमाई यांच्या प्रतिमेची मिरवणूक गावातील प्रमुख मार्गाने काढण्यात येणार असून, रात्री ८ वाजता बुद्ध व भीम गीतांचा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध मिशनरी गायिका प्रा. रवीराज भदे (नांदेड) आणि काजलताई साठे (पूर्णा) आपल्या सुमधुर गीतांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध करणार आहेत.हा संपूर्ण कार्यक्रम आनंद बुद्ध विहार, बेरळा येथे पार पडणार असून कार्यक्रमाचे आयोजन मातासाई महिला मंडळ, समता सैनिक दल व सम्राट बौद्ध मंडळी, बेरुळा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंचकमिटी तसेच ग्रामस्थ, महिला, युवक मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेत आहेत.या जयंती सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पत्नी शिक्षित व कमावण्यास सक्षम असली तरी

### पोटगी नाकारता येणार नाही – सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय



नवी दिल्ली: पत्नी शिक्षित असून स्वतः कमावू शकते, या कारणावरून तिला पोटगी नाकारता येणार नाही, असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. घटस्फोटानंतरही पत्नीचा सन्मानाने जगण्याचा अधिकार संपत नाही, असे ठामपणे नमूद करत न्यायालयाने पतीचे म्हणणे फेटाळले आणि पत्नीच्या पोटगीत दुपटीने वाढ करण्याचे आदेश दिले.अनामिका व डॉ. अतुल जैन यांचा विवाह नोव्हेंबर १९९४ मध्ये झाला होता. या दाम्पत्याला एक मुलगा असून, वैवाहिक वादांमुळे दोघे २०११ पासून वेगळे राहत होते. पती अतुल जैन यांनी घटस्फोटासाठी कुटुंब न्यायालयात अर्ज दाखल केला होता. भोपाळ येथील कुटुंब न्यायालयाने नोव्हेंबर २०१५ मध्ये घटस्फोट मंजूर करताना पत्नीला दरमहा १५ हजार रुपये पोटगी व ५० हजार रुपये एकरकमी देण्याचा आदेश दिला होता.ही पोटगी अपुरी असल्याचा दावा करत अनामिका यांनी मध्यप्रदेश उच्च न्यायालयात अपील दाखल केले. मात्र, उच्च न्यायालयाने कुटुंब न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत अपील फेटाळले. त्यानंतर पत्नीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली.सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान पत्नीच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, पती अतुल जैन हे डॉक्टर असून सुमारे १.६० लाख रुपये प्रतिमहिना उत्पन्न घेतात. शिवाय त्यांनी पुनर्विवाह केला आहे. तसेच मुलाच्या खर्चाची जबाबदारी पती घेत असल्याचा दावा देखील पत्नीने नाकारला. दुसरीकडे, पत्नी शिक्षित व कमावण्यास सक्षम असल्याने तिला जास्त पोटगी देण्याची गरज नसल्याचा युक्तिवाद पतीकडून करण्यात आला.दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. पत्नी शिक्षित असणे किंवा कमावण्याची क्षमता असणे, हे एकमेव कारण ठरू शकत नाही. घटस्फोटानंतरही पत्नीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि तो कायद्याने संरक्षित आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.या पार्श्वभूमीवर न्यायालयाने कुटुंब न्यायालयाचा पोटगीचा आदेश सुधारित करत दरमहा १५ हजार रुपयांऐवजी ३० हजार रुपये पोटगी देण्याचे आदेश दिले. तसेच पोटगीतील थकबाकी म्हणून ८ लाख १० हजार रुपये पत्नीला देण्याचे निर्देश पतीला दिले.हा निर्णय महिलांच्या हक्कांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून, घटस्फोटानंतरही पत्नीच्या आर्थिक सुरक्षिततेबाबत सर्वोच्च न्यायालयाची संवेदनशील भूमिका अधोरेखित करणारा ठरला आहे.

# संपादकीय:

## शिक्षणाचे खाजगीकरण : लोकशाहीसाठी वाढता धोका

शिक्षण हा कोणत्याही समाजाचा आत्मा असतो. तो केवळ नोकरी मिळवण्याचे साधन नसून विवेक, समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि लोकशाही मूल्ये घडवणारी प्रक्रिया आहे. मात्र आज भारतात शिक्षणाचे जे झपाट्याने खाजगीकरण सुरू आहे, ते या मूलभूत तत्त्वांनाच छेद देणारे ठरत आहे. शिक्षण हा हक्क नसून बाजारातील माल बनवण्याचा हा धोकादायक प्रवास आहे.शिक्षण : सेवा नव्हे, हक्कभारतीय संविधानाने शिक्षणाला मूलभूत अधिकार मानले आहे. मात्र वास्तवात आज शिक्षण व्यवस्थेचा कारभार शासनाच्या जबाबदारीतून हळूहळू खासगी भांडवलाच्या ताब्यात जात आहे. सरकार शाळा-महाविद्यालये बंद करत आहे, अनुदाने कमी करत आहे आणि त्याच वेळी खासगी शिक्षण संस्थांना मोकळे रान देत आहे. हा दुहेरी निकष केवळ दुर्दैवीच नव्हे, तर सामाजिक विषमता वाढवणारा आहे.फीस, दर्जा आणि नफा : शिक्षणाचा बाजार खासगी शिक्षण संस्थांचा मुख्य उद्देश शिक्षण नव्हे, तर नफा बनला आहे. अव्वाच्या सव्वा फी, प्रवेशासाठी देणग्या, 'ब्रँड स्कूल'चे आकर्षक जाहिरातबाजीचे जाळे—या सगळ्यामुळे गरीब, दलित, आदिवासी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून दूर ढकलले जात आहे. आज गुणवत्तेचा मापदंड 'हुशारी' नसून पालकांची आर्थिक क्षमता ठरत आहे.शासकीय शाळांची जाणीवपूर्वक घसरण खाजगीकरणाचा सर्वात गंभीर परिणाम म्हणजे शासकीय शाळांची हेतुपुरस्सर घसरण. शिक्षक भरती न करणे, पायाभूत सुविधांकडे दुर्लक्ष, विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे कारण देऊन शाळा बंद करणे—हे सगळे धोरणात्मक निर्णय खासगी संस्थांना आहेत, असा संशय बळावतो. ही केवळ प्रशासकीय चूक नसून शिक्षणविरोधी राजकारण आहे.शिक्षक : सेवक ते कंत्राटी मजूरखासगीकरणामुळे शिक्षकांचेही प्रचंड शोषण होत आहे. अल्प पगार, कामाची असुरक्षितता, संघटन स्वातंत्र्यावर गदा—यामुळे शिक्षक मानसिकदृष्ट्या अस्थिर होत आहेत. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची अपेक्षा करणे म्हणजे आत्मफसवणूकच ठरेल.लोकशाहीवर आघातशिक्षणाचे खाजगीकरण म्हणजे केवळ आर्थिक प्रश्न नाही; तो थेट लोकशाहीचा प्रश्न आहे. शिक्षण जर काही मोजक्या वर्गापुरते मर्यादित झाले, तर विचारस्वातंत्र्य, प्रश्न विचारण्याची क्षमता आणि सामाजिक भान नष्ट होईल. अडाणी, आज्ञाधारक आणि भेदभाव स्वीकारणारा समाज घडवण्याचा हा मार्ग आहे—जो लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.मग मार्ग काय?सरकारने शिक्षणातून हात काढून घेणे नव्हे, तर अधिक जबाबदारीने पुढे येणे गरजेचे आहे. शासकीय शाळांचे बळकटीकरण शिक्षक भरती आणि प्रशिक्षण शिक्षणावर जीडीपीचा किमान ६% खर्च खासगी संस्थांवर कठोर नियंत्रण शिक्षणाचे व्यापारीकरण थांबवणेहे उपाय केवळ कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष अंमलात आले पाहिजेतशिक्षणाचे खाजगीकरण हा विकासाचा नव्हे, तर विनाशाचा मार्ग आहे. शिक्षण जर बाजाराच्या हवाली केले, तर समाजाचा आत्माच विक्रीस निघेल. म्हणूनच आज गरज आहे ती जागरूक नागरिकांची, सजग पालकांची आणि लढाऊ शिक्षकांची—जे शिक्षणाला पुन्हा लोककल्याणाचे साधन बनवतील, नफेखोरीचे नव्हे.शिक्षण वाचवा, लोकशाही वाचवा—ही आज काळाची गरज आहे.




# जिल्हा परिषद शाळा फुटाना येथे 'आनंदनगरी' सोहळा उत्साहात संपन्न

विशेष प्रतिनिधी:
**राजू दीपके**

---

फुटाना ता. कळमनुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेला 'आनंदनगरी' उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमाच्या निमित्ताने शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांसह पालकवर्ग, महिला मंडळ, तरुण मंडळ तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या आनंदनगरी उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले खाण्याविषयक स्वादिष्ट, आकर्षक व सध्याच्या परिस्थितीची जाणीव करून देणारे पदार्थ विक्रीसाठी ठेवले होते. कमी वेळेत, स्वच्छतेची काळजी घेत, नावीन्यपूर्ण पद्धतीने तयार




केलेल्या या पदार्थांनी उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि मेहनतीला गावकऱ्यांकडून भरभरून दाद मिळाली.महिला मंडळ, तरुण मंडळ तसेच ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांचा मनसोक्त आनंद घेतला. पदार्थांची चव, मांडणी आणि विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास पाहून अनेकांनी कौतुकाची थाप दिली. या उपक्रमामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.या वेळी उपस्थित पालक व गावकऱ्यांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या खाद्यपदार्थ विक्री उपक्रमाचे विशेष कौतुक करत शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापनाचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांमधून व्यवहारज्ञान, आत्मविश्वास, संघभावना आणि जबाबदारीची जाणीव निर्माण होत असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.पालक व ग्रामस्थांनी शिक्षकांना एक महत्त्वाची सूचना करताना सांगितले की,"विद्यार्थ्यांचे मनोबल सातत्याने वाढवले पाहिजे. त्यांना नवनवीन प्रयोग करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे, जेणेकरून भविष्यात ते सक्षम, आत्मनिर्भर आणि समाजोपयोगी नागरिक बनतील."एकूणच, जिल्हा परिषद शाळा फुटाना येथे पार पडलेला 'आनंदनगरी' उपक्रम विद्यार्थ्यांच्या गुणविकासाचा आदर्श नमुना ठरला असून, अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# भानेगाव ग्रामपंचायत चौकशीच्या मागणीसाठी पंचायत समितीसमोर उपोषणयोजनांच्या नावाखाली उचलून खाण्याचा आरोप;

हदगाव |प्रतिनिधी :
**कृष्णा चौतमाल**

---

हदगाव तालुक्यातील मौजे भानेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयातील सन २०२१ ते २०२६ या कालावधीत झालेल्या कामांची सखोल चौकशी करण्यात यावी, या मागणीसाठी भानेगाव ग्रामपंचायत सदस्यांनी पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. ग्रामपंचायत प्रशासनातील कथित भ्रष्टाचार, अपहार व गैरव्यवहाराच्या गंभीर आरोपांमुळे तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.उपोषणकर्त्या ग्रामपंचायत सदस्यांचा आरोप आहे की, भानेगाव ग्रामपंचायतीमध्ये अनेक विकासकामांवर वेगवेगळ्या योजनांचे नाव दाखवून निधी उचलण्यात आला असून प्रत्यक्षात कामे अपूर्ण किंवा कागदोपत्रीच झालेली आहेत. काही ठिकाणी एकाच कामावर दोन-दोन योजनांतून निधी घेतल्याचा



संशयही व्यक्त करण्यात आला आहे.याशिवाय, शासनाच्या ऑनलाइन पोर्टलवर अनेक कामांचे जिओ-टॅग नसलेले फोटो, तसेच बनावट मोजमाप पुस्तिका (एम.बी.) तयार करून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करण्यात आल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला आहे. या प्रकारामुळे शासनाचा निधी वाया गेला असून ग्रामस्थांचा विकास खुंटला असल्याचा आरोप करण्यात येत आहे.उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे की, या सर्व प्रकरणांची चौकशी झाली नाही, तर भविष्यातही अशाच पद्धतीने गैरव्यवहार सुरू राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सन २०२१ ते २०२६ या संपूर्ण कालावधीतील सर्व कामांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, तसेच दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, उपोषणाची माहिती मिळताच पंचायत समिती परिसरात नागरिकांची गर्दी वाढली असून प्रशासनाकडून अद्याप ठोस आश्वासन देण्यात आलेले नाही. मात्र, उपोषणकर्ते आपल्या मागण्यांवर ठाम असून चौकशीचे लेखी आदेश मिळेपर्यंत उपोषण मागे न घेण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.प्रशांत शिंगणवार, ग्रामपंचायत सदस्य (उपोषणकर्ते) यांची प्रतिक्रिया पुढील प्रमाणे दिली "भानेगाव ग्रामपंचायतीमध्ये विकासाच्या नावाखाली मोठा भ्रष्टाचार झाला आहे. बनावट एम.बी., जिओ-टॅग नसलेले फोटो अपलोड करून निधी उचलण्यात आला. २०२१ ते २०२६ पर्यंतची सखोल चौकशी झाल्याशिवाय आम्ही उपोषण मागे घेणार नाही."या प्रकरणाकडे आता संपूर्ण हदगाव तालुक्याचे लक्ष लागले असून प्रशासन या गंभीर आरोपांवर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे.

# अटकळी येथे "प्राथमिक आरोग्य उपकेंद्र इमारतीचे भव्य उद्घाटन; आमदार जितेश भाऊ अंतापूरकर यांच्या हस्ते संपन्न

बिलोली प्रतिनिधी –
**अमोल शेरे**

---

अटकळी (ता. बिलोली) गावासाठी आरोग्य सेवांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणारा क्षण आज अनुभवायला मिळाला. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन तसेच पंधरावा वित्त आयोग अंतर्गत उभारण्यात आलेल्या "आयुष्यमान आरोग्य मंदिर" या आरोग्य उपकेंद्राच्या नवीन सुसज्ज इमारतीचे उद्घाटन देगलूर–बिलोली विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार जितेश भाऊ अंतापूरकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील खतगावकर हे होते. उद्घाटन सोहळ्याला स्थानिक नागरिक, विविध राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.उद्घाटनप्रसंगी आमदार अंतापूरकर




साहेब यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर व दर्जेदार आरोग्य सेवा मिळणे ही काळाची गरज आहे. अटकळी व परिसरातील गावांना या नवीन आरोग्य उपकेंद्रामुळे मोठा दिलासा मिळणार असून, प्राथमिक उपचार, माता-बाल संगोपन सेवा, लसीकरण, तपासण्या आणि विविध शासकीय आरोग्य योजना आता अधिक सुलभपणे उपलब्ध होतील. "आरोग्य हीच खरी संपत्ती आहे, आणि गावपातळीवर सुविधा उपलब्ध करून देणे हे आमचे कर्तव्य आहे," असेही त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाला युवा नेते रवी पाटील खतगावकर, माजी जिल्हा परिषद सदस्य माणिकराव लोहगावे, सरपंच संघटनेचे माजी तालुकाध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर पेंटे, भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष मारुती राहिरे, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत देवारे, माजी सरपंच विनोदराव देशमुख, अटकळी नगरीच्या प्रथम नागरिक कुसुमताई उत्तम बतलवाड, उपसरपंच रणवीर पाटील डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते शिवाजी पाटील डोंगरे, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन बजरंग बत्तलवाड, ग्रामसेवक हंबीरे साहेब, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य आयुब पटेल, आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, पत्रकार भास्कर भालेराव, अमोल शेरे, सामाजिक कार्यकर्ते शिवलिंग गायकवाड तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे वातावरण उत्साहपूर्ण होते. ग्रामस्थांनी नवीन इमारतीबद्दल समाधान व्यक्त करत ही सुविधा गावाच्या आरोग्य व्यवस्थेसाठी मोलाची ठरेल असा विश्वास व्यक्त केला. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यास निश्चित मदत होणार आहे.कार्यक्रमाचे नियोजन सुरळीत पार पडले असून, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आरोग्य सेवेच्या बळकटीसाठी पुढील काळातही सहकार्य करण्याचा निर्धार

# बार्शी तालुक्यात पंचायत समिती जिल्हा परिषद निवडणुका संपन्न.

बार्शी प्रतिनिधी
**राहुल भालशंकर**

---

दि. ७ फेब्रुवारीबार्शी तालुक्यामध्ये ६ जिल्हा परिषद व १२ पंचायत समिती गणाच्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी २५६ मतदान केंद्रातून १४५५५९ मतदारांनी मतदानाचा पवित्र हक्क बजावला असून यामध्ये ७७१५८ पुरुष व ६८४०१ महिलांचा समावेश असून तालुक्यामध्ये६७ . ७८ % मतदान शांततेत झाले आहे . तालुक्यामध्ये एकूण २१४७५४ एवढे मतदान असून यामध्ये ११२१४४ पुरुष , १०२६०३ स्त्री आणि इतर ७ जणांचा समावेश आहे .तालुक्यामध्ये ६ जिल्हा परिषद गटातून १६ तर १२ पंचायत समिती गणातून ३६




असे एकूण ५२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य ईव्हीएम मशीन बंद झाले आहे . उपळाई ठोंगे जिल्हा परिषद गटामध्ये एकूण ३५२६४ मतदार संख्या असून २५१३५ ( ७१.२८ % )इतके मतदान झाले असून यामध्ये उपळाई ठोंगे गणात १३०४४ म्हणजेच( ७५ . ०९% ) मतदान झाले तर आगळगाव गणामध्ये १२०९१ मतदान असून ते ६७५७% आहे .पांगरी जिल्हा परिषद गटामध्ये एकूण ३८४९६ ऐवढी मतदार संख्या २५८६५ ( ६७ .६९ % ) जणांनी मतदानाचा हक्क बजावला असून पांगरी गणात १२४४२ ( ६४ २९ %) तर कारी गणात १३४२३ (७०.१२% ) मतदान झालेउपळे दुमाला गटात ३५६१५ मतदार संख्या असून २४०४६ ( ६७.५२% ) जणांनी मतदान केले यामध्ये उपळे दुमाला गणात ११११२ ( ६६ . ६९ % ) तर गौडगाव गणात १२८५४ ( ६८ २५%) मतदान झालेपानगाव जिल्हा परिषद गटामध्ये ३४७९४ मतदार संख्या असून येथे २३७४५ ( ६८ . २४ % ) जणांनी मतदान केले आहे पानगाव गणात ११९२२ ( ६९ . ३७ %) तर बावी (आ) गणात ११८२३ ( ६७ १५%) मतदान झाले .मालवंडी जिल्हा परिषद गटामध्ये ३६०२४ मतदार संख्या असून येथे २३७७६ ( ६६ %) मतदान झाले यामध्ये मालवंडी गणात १२२७८( ६९ ०६%) तर सासुरे गणात ११४९८ ( ६६ %) मतदान झाले .शेळगाव जिल्हा परिषद गटामध्ये ३४५६१ ऐवढी मतदार संख्या असून २२९९२ ( ६६ .५३% )जणांनी मतदान केले यामध्ये शेळगाव गणात १०९९०( ६७ . ८४%%) तर मानेगाव गणात १२००२ ( ६५ . ६७ %) मतदान झाले .बार्शी तालुक्यामध्ये झालेल्या ६ जिल्हा परिषद गटामध्ये सर्वात जास्त उपळाई ठोंगे गटात ७१ .२८ % मतदान तर सर्वात कमी मालवंडी गटात ६६% मतदान झाले आहे १२ पंचायत समिती गणापैकी उपळाई ठोंगे ७५ .०९% तर सर्वात कमी सासुरे गणात ६३ .२ % मतदान झाले आहे.

व्हॉटस्ॲप अंक मिळणेसाठी
9822 474 807
वर संपर्क करा!

# मुदखेड येथे माता रमाई भीमराव आंबेडकर यांची 127 वी जयंती मोठ्या हर्षोल्हासात साजरी

मुदखेड|प्रतिनिधी :
**योगेश चौदंते**

-----------------------

त्यागमूर्ती, कोट्यवधी लेकरांची आई माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त मुदखेड शहरात मोठ्या हर्षोल्हासात व शांततेच्या वातावरणात विविध



कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात बुद्धभूमी प्रशिक्षण केंद्र, बुद्ध विहार येथे पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी समता सैनिक दलाच्या वतीने शिस्तबद्ध सलामी देत माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास नगराध्यक्ष, नगरसेवक, शासकीय व निमशासकीय विभागातील मान्यवर, तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.हा कार्यक्रम महामाया महिला मंडळ, भीमनगर; माता रमाई महिला मंडळ, अशोका नगर; लिंबुनी नगर; सिद्धार्थ नगर; नवी आबादी महिला मंडळ आदी महिला मंडळांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.यानंतर शांततेत व शिस्तबद्ध पद्धतीने दिव्य-भव्य महारॅली काढण्यात आली. रॅलीत माता रमाई आंबेडकर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा, पारंपरिक वेशभूषा आणि लेझीम पथकाचे

## सावरगाव येथे सुजाता महिला मंडळाच्या वतीने रमाई जयंती उत्साहात साजरी

अर्धापूर
(जिल्हा प्रतिनिधी):अर्धापूर तालुक्यातील सावरगाव येथे सुजाता महिला मंडळाच्या वतीने त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या सुरुवातीला माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सावरगाव परिसरातील महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. माता रमाई



यांनी आपल्या आयुष्यात सोसलेले कष्ट आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दिलेल्या खंबीर साथीमुळेच आज समाज प्रगती पथावर असल्याचे मत यावेळी उपस्थित महिलांनी व्यक्त केले.याप्रसंगी सुजाता महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी माता रमाईंच्या जीवनावर प्रकाश टाकला. 'माता रमाईंचे जीवन केवळ त्यागच नव्हता, तर तो कोट्यवधी लोकांसाठी प्रेरणेचा स्रोत आहे,' अशा शब्दांत त्यांचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमासाठी गावातील सर्व महिला भगिनींनी एकत्र येत जयंती साजरी केली. या छोटेखानी परंतु प्रेरणादायी सोहळ्याने सावरगावमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## नालंदा नगर बुद्ध विहार येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची 128 वी जयंती मोठ्या आनंदात साजरी..



बार्शी प्रतिनिधी
**राहुल भालशंकर सोलापूर**

-----------------------

:- सोलापूर शहरातील सुप्रसिद्ध अश्या नालंदा नगर बुद्ध विहार येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची १२८ वी जयंती मोठ्या आनंदात साजरी झाली.कार्यकामाच्या प्रमुख स्थानी सोलापूर महानगरपालिका नूतन उपमाहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर, प्रभाग २३ अ चे नूतन नगरसेवक सत्यजित वाघमोडे तसेच महेश देवकर हे उपस्थित होते.सदर कार्यकमाला सुशिलचंद्र भालशंकर, विजयकुमार क्षीरसागर, अश्वजित दुपारगुडे, नागोराव कांबळे, चंद्रकांत मागाडे, रामचंद्र बनसोडे, बाळासाहेब सुतकर, सिद्धार्थ सिद्धगणे, नितीन माने, अनुप गायकवाड, अतुल वाघमारे, अभिषेक गायकवाड, वैभव कांबळे, सुशिल घोडके, प्रसन्न शिवशरण,प्रथमेश भालेकर, प्रतीक भालेकर, प्रज्वल प्रसन्न, महादेवी दुपारगुडे, मगर ताई आदी परिसतील नागरिक उपस्थित होते.

## माता रमाई म्हणजे त्याग आणि समरसतेचे मूर्तिमंत रुप; डिग्रस कऱ्हाळे येथे जयंती उत्साहात साजरी

डिग्रस कऱ्हाळे:येथील नालंदा बुद्ध विहार येथे त्यागमुर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.माता रमाईंच्या त्यागाचा जागरयाप्रसंगी अक्षरा शंकर कुऱ्हे यांनी अत्यंत हृदयस्पर्शी शब्दांत आपले विचार मांडले. माता रमाईंच्या महतीवर प्रकाश टाकतांना त्या म्हणाल्या की, "बाबासाहेबांचे कर्तृत्व, त्यांचे व्यक्तिमत्व आणि त्यांची महानता संपूर्ण देशाला समजली, परंतु या यशस्वी पुरुषाच्या मागे ज्या स्त्रीने अतोनात त्याग केला आणि आपले संपूर्ण आयुष्य वाहिले, ती रमाई आम्हाला अजून पूर्णपणे कळली नाही."माता रमाईंच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करताना अक्षरा कुऱ्हे पुढे म्हणाल्या:"रमाई



म्हणजे त्याग, रमाई म्हणजे समरसता, रमाई म्हणजे सुंदरता आणि भव्यता. रमाई म्हणजे सर्वांना सांभाळून घेणारी ताकद आणि बाबासाहेबांची निरंतर सोबत देणारी सावली होय. त्या खऱ्या अर्थाने येथील दीन-दलितांची माऊली होत्या."सरपंचांचे प्रतिपादनकार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे समगा गावचे सरपंच सिद्धार्थ इंगळे किशोर कांबळे.समीक्षा नागरे आदर्श कुऱ्हे.राजु कुऱ्हे धम्मदीप कुऱ्हे करण कुऱ्हे सुमेध कुऱ्हे यांनीही आपले विचार व्यक्त केले. बाबासाहेबांच्या संघर्षमयी जीवनात माता रमाईंनी दिलेली साथ ही इतिहासातील सर्वात मोठी त्यागाची गाथा आहे, असे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले.या अभिवादन सभेला नालंदा बुद्ध विहार समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माता रमाईंच्या जयघोषाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता.

## स्वामी विवेकानंद विद्यालय, डिग्रस कऱ्हाळे येथे माता रमाई जयंती उत्साहात साजरी



डिग्रस कऱ्हाळे (विशेष प्रतिनिधी):
**सिद्धार्थ कुऱ्हे**

-----------------------

येथील भागीरथ शिक्षण संस्था संचलित स्वामी विवेकानंद विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे 'त्यागवंती' माता रमाई भीमराव आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. समाजासाठी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षात मोलाची साथ देणाऱ्या माता रमाईंच्या स्मृतीला यावेळी विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक जगताप सर होते. कार्यक्रमाची सुरुवात माता रमाईंच्या प्रतिमा पूजनाने झाली. यावेळी मुख्याध्यापक जगताप सर व राजकुमार कऱ्हाळे सर यांनी माता रमाईंच्या जीवनकार्यावर आपले मनोगत व्यक्त केले. "माता रमाईंचा त्याग आणि सोशिकता ही समाज घडवण्यासाठी मोठी प्रेरणा आहे," असे विचार त्यांनी मांडले.याप्रसंगी मान्यवरांची उपस्थिती:या सोहळयाला विद्यालयाचे तसेच शिक्षक वृंद बी. ए. लोणकर, एस. यू. राठोड, आर. एस. कऱ्हाळे, ए. टी. पुरी, एन. के. टाले, श्रीमती जे. व्ही. बोरकर, श्रीमती एस. टी. पटवे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी एम. एम. कऱ्हाळे, टी. एम. हलगेड यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले असून, विद्यार्थ्यांनीही याप्रसंगी माता रमाईंना अभिवादन केले.

# मुदखेड शहरात दूषित पाणीपुरवठा; कार्यालयीन अधीक्षकांना नागरिकांचा घेराव

प्रतिनिधी :
**विश्वदीप कांबळे**

-----------------------

मुदखेड शहरात गेल्या एक महिन्यापासून दूषित पाणीपुरवठा केला जात असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. याबाबत वारंवार तक्रारी करूनही नगरपरिषदेने दुर्लक्ष केल्याने संतप्त नागरिकांनी नगरपरिषदेच्या कार्यालयीन अधीक्षकांना घेराव घालून जाब विचारला. पाण्याचे नमुने तपासणीस देऊन दोन दिवसांत शुद्ध पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर नागरिकांचा संताप काहीसा निवळला.शहरातील प्रभाग क्रमांक ६ मधील चौधरी नगर, बामन गल्ली परिसरात सार्वजनिक नळांद्वारे येणारे पाणी अत्यंत दूषित असून त्यामध्ये आळ्या, किडे, कचरा तसेच ड्रेनेजचे पाणी मिसळलेले असल्याचे निदर्शनास आले आहे. या भागात दोन दिवसांनी पाणीपुरवठा केला जातो. सकाळी आठ ते नऊ या वेळेत नळाला पाणी सोडले जाते; मात्र गेल्या महिन्याभरापासून येणारे पाणी वापरण्यायोग्य नसल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.या संदर्भात मुख्याधिकारी तसेच पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख जमदाडे यांना कळवूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही. मुख्याधिकारी जालन्यात हजर नसल्याने कार्यालयीन अधीक्षक मीरा गोंडे यांना नागरिकांनी घेराव घालून समस्या मांडली.उबाठा शिवसेनेचे माजी शहराध्यक्ष अंकुश मामीडवार यांच्या नेतृत्वाखाली मारुती पांचाळ, श्रीनिवास पांचाळ, महादेव मोरे, शीलवंत डोंगरे, चंद्रकांत मोळके, गोपी कवानकर, संतोष चौधरी आदींनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवला. यावेळी दोन दिवसांत स्वच्छ व शुद्ध पाणीपुरवठा सुरू करण्याचे आश्वासन कार्यालयीन अधीक्षकांनी दिले.दरम्यान, दिलेल्या मुदतीत स्वच्छ पाणीपुरवठा न झाल्यास नगरपरिषदेच्या अकार्यक्षम कारभाराविरोधात मुख्याधिकाऱ्यांच्या दालनास कुलूप ठोकण्याचा इशारा उबाठा शिवसेनेचे माजी शहराध्यक्ष अंकुश मामीडवार यांनी दिला आहे.चौकट : अर्धवट पाणीपुरवठा योजनानगरपरिषदेअंतर्गत शहरास कायमस्वरूपी स्वच्छ पाणीपुरवठा मिळावा, यासाठी सन २०२१ मध्ये शासनाने ४२ कोटी रुपयांची कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे. मात्र दोन वेळा मुदतवाढ देऊनही ही योजना अद्याप पूर्ण झालेली नाही. परिणामी नागरिकांना आजही दूषित पाणीपुरवठा सहन करावा लागत असून नगरपरिषदेचा अकार्यक्षम कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

## जिल्हा परिषद शाळा फुटाणा व जेतवन बुद्ध विहार येथे माता रमाई आंबेडकर यांची 128 वी जयंती उत्साहात साजरी



विशेष प्रतिनिधी राजू दीपके फुटाणा ता. कळमनुरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील त्याग, संघर्ष आणि प्रेरणेचे प्रतीक असलेल्या माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती आज फुटाणा येथील जिल्हा परिषद शाळा तसेच जेतवन बुद्ध विहार येथे अत्यंत श्रद्धा व उत्साहात साजरी करण्यात आली.जिल्हा परिषद शाळा फुटाणा येथे आयोजित कार्यक्रमास गावातील सरपंच, उपसरपंच, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य, सोसायटीचे चेअरमन, विविध सामाजिक कार्यकर्ते तसेच शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना माता रमाई यांच्या जीवनातील त्याग, संयम, संघर्ष आणि बाबासाहेबांच्या कार्यात दिलेले मोलाचे योगदान यावर सखोल मनोगत व्यक्त केले. कठीण परिस्थितीतही कुटुंबाचा भार पेलत, बाबासाहेबांच्या ध्येयासाठी केलेला त्यांचा निःस्वार्थ त्याग विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे शिक्षकांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनीही या मनोगताचा लाभ घेत सामाजिक जाणीव आणि मूल्यांची शिकवण घेतली.दरम्यान, जेतवन बुद्ध विहार, फुटाणा येथेही माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यावेळी परिसरातील सर्व बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्हॉटसॲप अंक मिळणेसाठी
9822 474 807
वर संपर्क करा!

# माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त मार्डी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण

मोजे मार्डी, ता. औंढा नागनाथ येथे माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण माजी जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी हिंगोली अनिल भाऊ कांबळे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या कार्यक्रमासाठी फुले–शाहू–आंबेडकर विचारांचे कार्यकर्ते प्रकाश शेळके यांनी पुढाकार घेतला.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अनिल कांबळे (माजी जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी हिंगोली), प्रकाश शेळके (सामाजिक कार्यकर्ता), कांबळे पी. एम. (बौद्धाचार्य), गायकवाड जी. बी. (ग्रामविकास



अधिकारी, मार्डी), पवार सर, बाबाराव अनिता सरोदे (सरपंच, मनेवार (उपसरपंच), मार्डी), कचरू कठाळे, शुभम झोडगे, तानाजी कोंडबा गायकवाड, झोडगे, विष्णू खंदारे, चांदू दरबेस्वार (मुख्याध्यापक, सरोदे, शामराव सरोदे, जि. प. शाळा मार्डी), गजानन खंदारे, मच्छिंद्र खंदारे, प्रदीप बलखंडे, शेषाबाई सरोदे, सुरेश देवकर, मारोती माने, पुंजाराव नरोटे, नितीन गायकवाड तसेच महिला, विद्यार्थी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात बोलताना अनिल भाऊ कांबळे यांनी माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय, संघर्षमय जीवनाचे स्मरण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्यामागे रमाईंचे मोलाचे योगदान अधोरेखित केले. तसेच बाबासाहेबांच्या विचारांचा समाजात जागर करण्याची गरज व्यक्त करत सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला असून उपस्थितांनी माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतीस अभिवादन करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाज परिवर्तनाचा संकल्प व्यक्त केला.

# त्या कामचुकार मंडळ अधिकाऱ्यांना निलंबित करा - विजय वाठोरे

## दलित पँथरचे हिमायतनगर तालुका अध्यक्ष विजय वाठोरे यांनी तहसीलदारांना दिले निवेदन

दैनिक प्रजाशाहीचा आवाज
हिमायतनगर प्रतिनिधी /
**प्रभु कदम**

------------------------------

नांदेड हिमायतनगर तालुक्यातील सरसम सज्जा येथे मंडळ अधिकारी म्हणून कार्य करत असलेल्या मंडळ अधिकारी पवार मॅडम या कार्यालयीन वेळेमध्ये कार्यालयात हजर न राहता वेळेच्या आधीच घराला निघून जात असल्याचे निदर्शनास आले आहे. वरून सामान्य नागरिकांना कामासाठी आपल्या कार्यालयात अनेक चकरा मारायला भाग पाडत आहेत. सामान्य माणसाला सोडा पण पत्रकार बांधवांना सुद्धा कार्यालयीन वेळेत कार्यालयात काम करून देण्यासाठी भेटत नाहीत. या मंडळ अधिकाऱ्याबाबत अनेक तक्रारी सामान्य माणसाकडून होत होत्या. यासंबंधी दलित पँथरचे तालुका अध्यक्ष विजय वाठोरे व दाऊ गाडगेवाड यांनी हिमायतनगरच्या तहसीलदार सौ पल्लवी टेमकर यांना निवेदन देत या कामचुकार मंडळ अधिकारी यांना निलंबित करा अन्यथा लोकशाही मार्गाने पँथर स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. हिमायतनगर तालुक्यामध्ये अधिकारी लोकांवर कुणाचाही वचक राहिला नसून अनेक अधिकारी काम चुकार बनले आहेत. कधीही यायचे आणि कधीही जायचे हे सर्वांच्या




अंगवळणी पडलेले आहे. कार्यालयीन वेळेमध्ये कार्यालयात उपस्थित न राहता गोरगरीब,सामान्य लोकांची कामे प्रलंबित ठेवण्याचा हातखंडा अनेक अधिकाऱ्यांचा असल्याचा निदर्शनास येतो. सामाजिक कार्यकर्ते विजय वाठोरे हे आपल्या एका कामानिमित्त सरसम मंडळाच्या मंडळ अधिकारी असलेल्या पवार मॅडम यांच्याकडे गेले होते.त्यांना मंडळ अधिकारी यांनी अमुक तमुख कागदपत्र आणा तेव्हा करतो.म्हणत १५ दिवसांपेक्षा जास्त दिवस घोळवत ठेवले. शेवटी दिनांक २ फेब्रुवारी रोजी विजय वाठोरे हे मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयात साडेतीन ते चार च्या दरम्यान गेले असता मंडळ अधिकारी कार्यालयात हजर नव्हत्या. त्यांनी फोन करत कामाबद्दल विचारणा केली. पण मंडळ अधिकारी पवार मॅडम यांनी उडवा उडवीची उत्तरे देत मी आता घराकडे निघाले आहे. मला जायला गाडी नाही.तुम्ही गाडी करून देता का ? या भाषेत बोलत उत्तर दिले.नंतर त्या कागदपत्रांवर सही करण्यासाठी सुद्धा आल्या नाहीत. उलट कार्यालयातील कारकूनच सर्व कागदपत्रांवरशिक्के मारून सह्या करतो. ही बाब लक्षात आली. यामुळे दलित पँथर चे तालुका अध्यक्ष विजय वाठोरे यांनी हिमायतनगरच्या तहसीलदार सौ पल्लवी टेमकर मॅडम यांच्याकडे निवेदन देत या कामचुकार मंडळ अधिकारी यांना तात्काळ निलंबित करा अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असे निवेदन दिले. या निवेदनात विजय वाठोरे यांनी संबंधित मंडळ अधिकारी यांना निलंबित करा,तालुक्यातील श्रावण बाळ संजय गांधी निराधार योजना व इतर योजनेसाठी लागणारी २१००० चे उत्पन्न व लाभार्थ्यांची चौकशी करून निकषात असलेल्यांनाच योजनेचा लाभ द्यावा अन्यथा त्यांना योजनेतून बाद करण्यात यावे.अनेक बोगस लाभार्थ्यांना सह्या सिक्के देऊन योजनेमध्ये बोगस लाभार्थ्यांची भरती झाल्याची शंका निवेदनकर्त्यांना असल्यामुळे त्यांनी सदर बाबीची तात्काळ चौकशी करून याचा छडा लावावा.अश्या मागण्या केल्या आहेत.या कामचुकार मंडळ अधिकारी यांना निलंबित न केल्यास पँथर स्टाईलने आंदोलन केले जाईल असा इशाराही दलित पँथर चे हिमायतनगर तालुका अध्यक्ष विजय वाठोरे व दाऊ गाडगेवाड यांनी दिला आहे.

# माळधामणी येथे माता रमाई जयंतीनिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर संपन्न

हिंगोली (प्रतिनिधी):
**सिद्धार्थ कुऱ्हे**

------------------------------

"विश्वाला विश्वरत्न मिळाले भिमाईच्या कुशीमुळे, अन् विश्वाला विश्वदीप मिळाले रमाईच्या त्यागामुळे." या उक्तीप्रमाणे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा कणा असलेल्या त्यागमुर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीचे औचित्य साधून माळधामणी (ता. जि. हिंगोली) येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.प्रज्ञावंत प्रतिष्ठान निळ वादळ, समता सैनिक दल व समस्त गावकऱ्यांच्या वतीने



शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी बौद्ध विहाराजवळ हे शिबिर अत्यंत उत्साहात पार पडले.तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी:या आरोग्य शिबिरासाठी शासकीय आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांची आरोग्य तपासणी केली. यामध्ये समुदाय आरोग्य अधिकारी डॉक्टर वैशाली मुळे मॅडम आणि डॉक्टर अमोल दिपके सर यांनी रुग्णांना मार्गदर्शन व औषधोपचार केले. तसेच आरोग्य सेविका श्रीमती सुजाता मठपती, आरोग्य सेवक के. एम. राठोड सर व श्री गजानन सुरसे यांनी शिबिराच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली. गावातील आशा स्वयंसेविका रेखा सावंत व सुनिता कुरवाडे यांनीही उपस्थितांना आरोग्य सुविधा पुरवण्यासाठी सहकार्य केले.मान्यवरांची उपस्थिती व आयोजन:माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त केवळ उत्सवी स्वरूप न देता, समाजोपयोगी उपक्रम राबवल्याबद्दल माळधामणीकरांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सकाळी १० ते १२ या वेळेत झालेल्या या शिबिराचा लाभ शेकडो ग्रामस्थांनी घेतला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रज्ञावंत प्रतिष्ठान निळ वादळ व समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांनी आणि गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले. 'महामानवाची सावली' माता रमाई यांच्या स्मृतीला अभिवादन

# त्यागमूर्ती माता रमाई जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी
**कुणाल भुरे**

------------------------

दि.७ (नांदेड.) श्रावस्ती नगर येथील अंगणवाडी क्रमांक ०२ येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची १२८ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तत्पूर्वी माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अंगणवाडी सेविका संघमित्रा सरपाते, अंगणवाडी सेविका वंदना भुरे यांनी माता रमाई यांच्या कार्याबद्दल मुलांना



सांगितले. त्या म्हणाल्या,माता रमाई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षाच्या काळामध्ये खंबीरपणे त्यांची साथ देऊन पत्नीची महत्त्वाची भूमिका त्यांनी बजावली.जेंव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिक्षण घ्यायला गेले त्यावेळेस माता रमाई यांनी अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये संसाराचा गाढा चालवत डॉ.बाबासाहेबांच्या पाठीशी ठामपणे उभ्या राहिल्या. माता रमाई ह्या गंभीर आजाराने ग्रस्त होत्या तरीपण त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची साथ सोडली नाही, असे प्रतिपादन अंगणवाडी सेविका संघमित्रा सरपाते अंगणवाडी सेविका वंदना भुरे यांनी केले. यावेळी बालक, बालिका व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या 128 व्या जयंतीनिमित्त मिरवणुकीत डॉ. सौ. रेणुका गजानन पतंगे यांचा सक्रिय सहभाग

वसमत / प्रतिनिधी
**चंद्रकांत गजभार**

------------------------------

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनप्रवासातील आधारस्तंभ आणि त्याग, समर्पण व कर्तृत्वाचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त वसमत शहरात भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले होते. या मिरवणुकीत डॉ. सौ. रेणुका गजानन पतंगे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.डॉ. सौ. रेणुका गजानन पतंगे या शिवसेना महिला जिल्हाप्रमुख, हिंगोली असून त्या नगरसेवक (न. प.) वसमत म्हणूनही सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी मिरवणुकीत सहभागी होत




माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.यावेळी बोलताना डॉ. सौ. रेणुका पतंगे म्हणाल्या की, “माता रमाई आंबेडकर यांनी बाबासाहेबांच्या महान कार्यामागे उभे राहत संपूर्ण आयुष्य त्याग, संघर्ष आणि संयमाने घालवले. महिलांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजपरिवर्तनासाठी पुढे यावे,” असे आवाहन त्यांनी केले.मिरवणुकीदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या विचारांचे घोषवाक्य, भीमगीत, बॅनर-फलक यामुळे संपूर्ण परिसर भीममय वातावरणाने भारावून गेला होता. या कार्यक्रमात शिवसेना महिला आघाडीच्या कार्यकर्त्या, स्थानिक पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, युवक-युवती तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.या मिरवणुकीमुळे माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागमय जीवनकार्याचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचण्यास मदत झाली असून सामाजिक एकात्मतेचा प्रत्ययही नागरिकांना आला, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.